# अर्थशास्त्र विभाग अहवाल २०२४-२५

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये अर्थशास्त्र विभागाने उच्च दर्जाचे शिक्षण देणे सुरू ठेवले, त्यामुळे चिकाटीच्या विद्यार्थ्यांना सैद्धांतिक आणि व्यावहारिक पैलूंमध्ये एक मजबूत पाया मिळाला. नियमित व्याख्याने, क्षेत्र भेट आणि परस्परसंवादी अध्यापन पद्धतींचा वापर करून शैक्षणीक निकाल वाढविण्यात आले आहे .

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि प्रागतिक शिक्षण संस्थेच्या नूतन कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय राजापूर यांच्या वतीने, कला विभागाने ९ फेब्रुवारी २०२५ रोजी कोकण येथे क्षेत्रभेटीचे आयोजन केले होते. या क्षेत्रभेटीत विद्यार्थ्यांना आर्थिक ,सामाजिक आणि भौगोलिक घटकांचे मार्गदर्शन केले.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये नूतन कला महाविद्यालय राजापूर मधील अर्थशास्त्र विभागात प्राध्यापक डॉ. जांगिड एस्. आर. (विभाग प्रमुख) प्राध्यापक डॉ. आहेर पी.बी. (सहाय्यक प्राध्यापक) म्हणून काम करत आहेत. अर्थशास्त्र विभागात प्रथम वर्ष कला 28 विद्यार्थी द्वितीय वर्ष अर्थशास्त्र स्पेशल 25 विद्यार्थी तर तृतीय वर्ष अर्थशास्त्र विभागात 06 विद्यार्थी आहेत. तर वाणिज्य विभागात प्रथम वर्ष अर्थशास्त्र विषयाला 40 विद्यार्थी, द्वितीय वर्ष अर्थशास्त्र विषय 70 तर तृतीय वर्ष वाणिज्य अर्थशास्त्र विषयाला 36 एवढे विद्यार्थी होते.

अर्थशास्त्र विभागातील डॉ. जांगीड एस. आर. व डॉ. आहेर पी.बी. यांनी संगमनेर महाविद्यालय संगमनेर , या ठिकाणी एक दिवशीय सेमिनार मध्ये सहभागी होऊन राष्ट्रीय स्तरावर पेपर पब्लिकेशन केले .